# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. 389/२०२१

संशोधन केंद्रामध्ये संलग्न मार्गदर्शक नेमण्यास मान्यता देणेबाबत...

संशोधन केंद्रावर संलग्न करून घ्यावयाच्या मार्गदर्शकांबाबत तयार करावयाचे नियम खालीप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

अ) प्रत्येक संशोधन केंद्रावर ज्या विषयासाठी संशोधन केंद्र दिले आहे त्याच विषयाचा किमान (पूर्णवेळ) १ संशोधन मार्गदर्शक असावा की, जो त्या मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा महाविद्यालयाचा कायमस्वरूपी मान्यताप्राप्त अध्यापक आहे.

ब) दुसऱ्या संशोधन मार्गदर्शकासंदर्भात पूर्णवेळ मार्गदर्शक उपलब्ध होईपर्यंत "संलग्न मार्गदर्शक" म्हणून मान्यता देण्यात येईल. संलग्न मार्गदर्शकाची मान्यता देताना खालील अटी व शर्ती विहित करण्यात येत आहेत.

१) संलग्न मार्गदर्शक हा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील अथवा परिसंस्थेतील कायमस्वरूपी मान्यताप्राप्त अध्यापक असावा.

२) संलग्न मार्गदर्शक हा, संशोधन केंद्रास ज्या विषयासाठी मान्यता मिळालेली आहे त्याच विषयाचा विद्यापीठ मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक असावा व त्यास संलग्न होण्याच्या दिनांकापासून किमान ३ वर्षे मान्यता असावी आणि किमान पुढे ३ वर्षे सेवा शिल्लक असावी.

३) संशोधन केंद्र व संलग्न मार्गदर्शक कार्यरत असलेले महाविद्यालय/मान्यता प्राप्त परिसंस्था या मधिल अंतर शहरी भागामध्ये ५० कि.मी. व ग्रामीण भागामध्ये १०० कि.मी. पेक्षा कमी असावे.

४) संलग्न मार्गदर्शकाने कार्यरत असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा/ संस्था पदाधिकाऱ्यांचे ना–हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५) संशोधन केंद्राचे कार्य सुरळीतपणे पार पडण्याच्या दुष्टीने संलग्न मार्गदर्शकाने संलग्नित झाल्यावर संशोधन केंद्रामध्ये संशोधन मार्गदर्शन व इतर कार्यासाठी वेळोवेळी हजर राहणे आवश्यक आहे.

६) संशोधन केंद्रामध्ये नव्याने विद्यार्थी मार्गदर्शकाकडे नोंदवितांना वरील नियमांची अंमलबजावणी करण्यात यावी.

७) संलग्न मार्गदर्शक होवू इच्छिणाऱ्या अध्यापकांच्या महाविद्यालयात संबंधित विषयातील संशोधक केंद्र असल्यास अशा मार्गदर्शकांना इतर संशोधन केंद्रावर संलग्नीत होता येणार नाही.

८) संलग्न मार्गदर्शकांनी संलग्नित झाल्यापासून संलग्नित संशोधन केंद्रावरच विद्यार्थी नोंदवणे आवश्यक आहे.

९) संलग्न मार्गदर्शकांना संशोधन केंद्राची संलग्नता किमान ३ वर्षे बदलता येणार नाही. संलग्न संशोधकास संलग्नता बदलण्यासाठी विद्यापीठ शैक्षणिक प्रवेश विभागाची मान्यता घेणे आवश्यक राहिल.

१०) संलग्न मार्गदर्शकास फक्त संलग्नित झालेल्या संशोधन केंद्रावरच विद्यार्थी देण्यात येतील.

११) संशोधन केंद्र मान्यतेसाठी प्रत्येक विषयाला किमान एक त्याच महाविद्यालयातील मार्गदर्शक व एक संलग्न मार्गदर्शक विचारात घेतले जातील.

वरील नियम हे केवळ प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था यांनाच लागू राहतील.

गणेशखिंड, पुणे— ४११००७ )
जावक क्र. सीए/२१२५ )
दिनांक २०, डिसेंबर, २०२१ )

डॉ. प्रफुल्ल पवार
(कुलसचिव)

प्रत :

१. मा.प्राचार्य/संचालक, प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्न महाविद्यालये/मान्याताप्राप्त परिसंस्था

२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ

३. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश आणि पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ